# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### गंगापूर तालुक्यातील कोंडापूर ते भिवधानोरा रस्त्याच्या कामाबाबत

**(१) १७०८३ (२५-०३-२०२३) श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भिवधानोरा (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शिवारातील काही भाग शिवना नदीच्या दोन्ही बाजुस येत असून शिवना नदीचे पाणी सर्वत्र पसरत असल्याने भिवधानोराला जाण्या-येण्यासाठी मार्ग नसल्याने शेतकरी आपआपल्या शेतात वस्ती करुन राहतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जायकवाडी धरणाचे बॅक वॉटरचे पाणी शिवना नदीमध्ये नदी काठावर पसरत असल्याने शेतकरी, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना भिवधानोरा येथे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवधानोरा ते कोंडापूर ह्या रस्त्याचे काम जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत केल्यास वस्तीवरील शेतकऱ्यांना, ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना गावात येण्या-जाण्यासाठी सोयीस्कर मार्ग होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवधानोरा ते कोंडापूर या रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भिवधानोरा ते कोंडापूर असा रस्ता रस्ते विकास योजना २००१ ते २०२१ या आराखड्यात समाविष्ट नाही, दोन्ही गावे पुनर्वसित असून डांबरी पृष्ठभागाने राज्यमार्गाला जोडलेली आहेत. दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी शेतीसाठी वापर करण्यासाठी सदर रस्ता रस्तेविकास योजनेत समाविष्ट करणे व दोन्ही गावामध्ये असलेल्या शिवना नदीवर मोठा पूल बांधणे आवश्यक असल्याचे जि.प. छत्रपती संभाजीनगर यांनी नमूद केले आहे.

(४) भिवधानोरा व कोंडापूर ही दोन्ही पुनर्वसित गावे डांबरी रस्त्याने राज्य मार्गाशी जोडलेली असून पुनर्वसित गावामध्ये मूलभूत सुविधा देण्यात आल्या आहेत. जिल्हा छत्रपती संभाजीनगर, ता.गंगापूर येथील

कोंडापूर ते भिवधानोरा हा रस्ता अनियोजित (Not Plan) रस्ता असून जायकवाडी धरणाच्या नाथ सागर जलाशयाच्या बुडीत क्षेत्रातून जातो या कारणाने रस्ते विकास आराखड्यामध्ये समाविष्ठ करणे शक्य होत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांगांच्या शाळेतील कर्मचाऱ्यांना १०० टक्के वेतन अनुदान अदा करणेबाबत

**(२) २०५८९ (०८-०८-२०२३) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांगांच्या १२३ शाळा / कर्मशाळेतील २५६८ कर्मचारी गत पंधरा ते वीस वर्षापासून विनावेतन दिव्यांग विद्यार्थ्यांची सेवा करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग शाळा/कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये १०० टक्के वेतन अनुदान मंजूर केले असून प्रशासनाकडून १२३ शाळांच्या वारंवार तपासण्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चस्तरीय समितीकडुन कर्मचाऱ्यांना १०० टक्के वेतन अनुदान द्यावयाचे असूनही दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार निधीअभावी उच्चस्तरीय समितीच्या प्रस्तावानुसार ५० टक्के वेतन अनुदान गत पंधरा ते वीस वर्षापासून विनावेतन दिव्यांग विद्यार्थ्यांची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने १२३ शाळा/कर्मशाळेतील २५६८ कर्मचाऱ्यांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार १०० टक्के वेतन अनुदान अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या विनाअनुदान तत्वावरील "अ" श्रेणीतील १२३ विशेष शाळांना काही अटींच्या अधिन राहून १०० टक्के अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबत दिनांक ०८/०४/२०१५ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यानुषंगाने उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १६/१०/२०१८ रोजीच्या ७ व्या बैठकीमध्ये उपरोक्त १२३ शाळा/कर्मशाळांमधील १२१ शाळा/ कर्मशाळांना एकूण २४६४ पदांना ५० टक्के अनुदान तत्वावर आणण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली. सदर मान्यतेस अनुसरुन स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या विनाअनुदान तत्वावरील "अ" श्रेणीतील १२१ विशेष शाळांमधील एकूण २४६४ पदांना ५० टक्के वेतन अनुदान तत्वावर मान्यता देण्यासंदर्भातील दिनांक ०६/११/२०१८ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) उक्त १२१ शाळा/कर्मशाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचऱ्यांना ५० टक्के वेतन अनुदान तत्वावरुन १०० टक्के वेतन अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये ४ टक्के आरक्षण लागू केल्याबाबत

**(३) २०७१३ (०८-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :-** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत ४ टक्के आरक्षण माहे एप्रिल, २०२३ पासून लागू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत किती दिव्यांग कर्मचाऱ्यांना आरक्षणाचा लाभ देण्यात आला तसेच दिव्यांगांच्या गट अ व गट ब मधील पदोन्नतीत आरक्षण देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०९-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासननिर्णयान्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-ड ते गट-अ च्या निम्नस्तरापर्यंत पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यात आले आहे. तसेच दिव्यांग कल्याण विभागाच्या दिनांक १२ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये अंमलबजावणी करण्याच्या सूचना सर्व विभागांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महावितरण मधील कंत्राटी कामगारांना कामावरून कमी करण्यात येत असल्याबाबत

**(४) २११११२ (०४-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरणच्या जळगाव तसेच भांडूप, मुंबई परिमंडळातील कंत्राटी कामगारांना केवळ आय.टी.आय. उत्तीर्ण नसल्याने कामावरुन कमी करण्यात आले असल्याचे बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज कंपन्यांना गरज होती त्यावेळी भरती न करता बाह्ययंत्रणेद्वारे भरती केली, आता शासनाने कुशल कामगार हवे असा आदेश काढून कामगार आयटीआय नसल्याने त्यांना कमी करीत आहे त्यावर कंत्राटी कामगारांना कामावरुन कमी करण्याऐवजी कौशल्याने सक्षम करावे अशी मागणी कामगार युनियन यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामगारांना १२ ते १५ वर्षे झाली असून त्यांचे वय देखील झाले असल्याने महावितरणच्या १६ झोनमधील सुमारे २४,००० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि महावितरणच्या कंत्राटी कामगारांना कामावरुन कमी करण्याऐवजी त्यांना कौशल्याने सक्षम करून कामावर कायम करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

कंत्राटी कामगारांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता ही आय.टी. आय. असून जळगाव मंडळांतर्गत १५६ कंत्राटी कामगारांकडे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता नसल्याने कंत्राटदारांकडून त्यांना माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२२ पासून कामावरुन कमी करण्यात आले होते. भांडूप मुंबई परिमंडळ कार्यालयांतर्गत अशी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही किंवा कार्यवाही सुरु नाही.
(२) हे खरे नाही.

कंत्राटी कामगारांना कामावरुन कमी करण्याऐवजी कौशल्याने सक्षम करावे अशी मागणी कामगार संघटनांनी महावितरण प्रशासनाकडे केलेली नाही.
(३) हे खरे नाही.

बाह्यस्त्रोताद्वारे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांकडे तांत्रिक कर्मचारी पदासाठी आवश्यक असणारी आय.टी.आय. शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेल्या कंत्राटी कामगारांना कामावरुन कमी केलेले नाही.
(४) महावितरण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटदारामार्फत यापूर्वी काम करत असलेले व विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त नसल्यामुळे कमी करण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांना बेरोजगारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करुन विद्युत सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक या पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता आय.टी. आय प्राप्त करण्याकरीता ०३ वर्षाचा अवधी देण्यात आलेला आहे. याबाबतचे परिपत्रक क्र. औसंवि/अ/२६४७५, दिनांक ०१/०९/२०२३ सर्व क्षेत्रिय कार्यालयाकरीता प्रसारीत केलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात २५ वर्षांखालील ४२ टक्के पदवीधर तरुण बेरोजगार असल्याबाबत

**(५) २१४४८ (०५-०१-२०२४) श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात २५ वर्षाखालील ४२ टक्के पदवीधर तरुण बेरोजगार असल्याचे अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या अहवालातून माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार २५ वर्षापेक्षा कमी वयाच्या निराधार तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाणे १३.५ टक्के आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या बेरोजगार तरुणांना तातडीने रोजगार मिळवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (११-१०-२०२४) :** (१), (२) व (३) अझीम प्रेमजी विद्यापीठाचा कोणताही अहवाल शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, राज्यातील तरुण वयोगटातील उमेदवारांना अत्याधुनिक तंत्रज्ञानानुरुप कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता उक्त विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची स्थापना करण्यात आली. सदर सोसायटीमार्फत राज्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रातील अभ्यासक्रमांचे सूचीबध्द प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून अल्पमुदतीचे प्रशिक्षण देवून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, सोसायटीमार्फत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना व उपजीविकेसाठी कौशल्य संपादन ज्ञान जागरुकता अभियान (SANKALP) ह्या केंद्र पुरस्कृत योजना आणि प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (प्रमोद महाजन- ग्रामीण कौशल्य केंद्र व आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र) ह्या राज्य शासन पुरस्कृत योजना व किमान कौशल्य विकास केंद्र ही जिल्हा पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे.

सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांना संयुक्त व्यासपीठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनामार्फत रोजगार मेळावे आयोजित करण्यात येतात. त्याकरीता नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांची तसेच नियोक्त्यांच्या नोंदणीसाठी विभागामार्फत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

दिनांक ११/०२/२००४ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून दिनांक २८/०८/२०२४ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना रुपये १०.०० लक्ष पर्यंतची कामे विना निविदा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता दिनांक ०९/०७/२०२४ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनांत ६ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याकरीता उमेदवारांसाठी तसेच मनुष्यबळाची आवश्यकता असलेल्या शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनांसाठी विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणीची सुविधा उपलब्ध

करुन देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत इयत्ता बारावी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ ६,०००/-, आय. टी. आय/पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ ८,०००/- व पदवी/पदव्युत्तर पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थींना प्रतिमाह ₹ १०,०००/- इतके विद्यावेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर विद्यावेतन प्रशिक्षणार्थींच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) येथील एम.आय.डी.सी. परिसरातील वीजपुरवठ्याची समस्या सोडविण्याबाबत

**(६) २१७५५ (०४-०१-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) येथील एम.आय.डी.सी. परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून वीजपुरवठ्याचा अभावामुळे जवळपास ४२ उद्योग अडचणीत आले असून त्यांच्या उद्योगावर व उत्पादन क्षमतेवर परिणाम होत असून या उद्योगांमध्ये काम करणाऱ्या हजारो कामगारांच्या रोजगारीचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणी कायम स्वरूपी उपाययोजना करण्याच्यादृष्टीने ५,०००/- के.व्ही.ए. चा ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे केली असून एम.एस.इ.बी. याकडे दुर्लक्ष करित असल्याची बाब माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू एम.आय.डी.सी. परिसरात ५,०००/- के.व्ही.ए. चा ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबत तसेच जिल्हा नियोजन समितीच्या प्रशासकीय मंजूरी व निधी उपलब्धतेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
अध्यक्ष, कुडाळ एम.आय.डी.सी. इंडस्ट्रिज असो. यांचेकडून दिनांक ०७/१०/२०२३ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) सद्य:स्थितीत एम.आय.डी.सी.करीता स्वतंत्र ३३/११ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे. एमआयडीसी मध्ये स्वतंत्र उपकेंद्राकरीता लागणारी जागा एमआयडी मार्फत उपलब्ध करुन देण्यात आली असून सदर जागेचे इसारा मूल्य रुपये ५८,३६७/- एमआयडीसी यांचे बँक खात्यावर महावितरणकडून भरणा करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात समूह विद्यापीठाच्या संकल्पनेला महाविद्यालयांचा प्रतिसाद मिळत नसल्याबाबत

**(७) २२९३२ (२२-०७-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्या शैक्षणिक धोरणात समूह विद्यापीठाची (क्लस्टर युनिव्हर्सिटी) संकल्पना मांडत जास्तीत जास्त महाविद्यालयांनी त्याकडे वळावे यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात प्रयत्न होत असले तरी या योजनेला जिल्ह्यातील महाविद्यालये प्रतिसाद देत नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूरसह अनेक जिल्ह्यातून या योजनेसाठी एकही प्रस्ताव आलेला नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने समूह विद्यापीठाच्या संकल्पनेला महाविद्यालये प्रतिसाद देत नसल्यामागील कारणे काय आहेत तसेच सदरील योजना सक्षमपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०९-१०-२०२४) :** (१) हे खरे नाही.

राज्यामध्ये समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.११२/विशि-३ दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ अन्वये शासनाने मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहे. तसेच, शासन निर्णय दिनांक १० जानेवारी, २०२४ अन्वये समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी/ व्यवस्थापनानी शासनाकडे अर्ज करण्याच्या कार्यपध्दतीबाबत व तपशीलवार प्रकल्प अहवाल निश्चित करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

कोल्हापूर येथील श्री.वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर या संस्थेचा वारणा विद्यापीठ, वारणानगर, जि.कोल्हापूर हा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला असून सदर विद्यापीठाच्या प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २५/०८/२०२४ च्या बैठकीत मंजूरी मिळाली आहे.

याशिवाय, शासनाकडे मालाड कांदिवली एज्युकेशन सोसायटी, मालाड मुंबई यासंस्थेचा प्रस्ताव प्राप्त झाला असून छाननी समितीने दिलेल्या अहवालानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच, नागपूर येथील शासकीय विज्ञान संस्थेचा, वर्धा येथील शिक्षा मंडळ वर्धा या संस्थेचा आणि महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी पुणे या संस्थेचा असे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावांची छाननी समितीकडून तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुराबर्डी (जि.नागपुर) येथे गोंडवाना संग्रहालय आणि आदिवासी संशोधन प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याबाबत

**(८) २३०७७ (१८-०७-२०२४) श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील सुराबर्डी येथे आदिवासी बांधवांकरीता गोंडवाना संग्रहालय आणि आदिवासी संशोधन प्रशिक्षण उपकेंद्र सुरू करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी बांधवांकरीता संशोधन प्रशिक्षण उपकेंद्र सुरू न झाल्याने आदिवासी संघटनेकडून संविधान चौकात धरणे आंदोलन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी बांधवांकरीता गोंडवाना संग्रहालय आणि आदिवासी संशोधन प्रशिक्षण उपकेंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. विजयकुमार गावित (१५-१०-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्र स्थापन करण्यासाठी मौजे सुराबर्डी, तहसिल नागपूर (ग्रामीण), जिल्हा नागपूर येथिल सर्वे नंबर ४१ आराजी ८.५५ हेक्टर आर पैकी एकूण १५ एकर जमीन मंजूर करण्यात आलेली आहे. जागा ताब्यात घेवुन जागेच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे. संग्रहालयाच्या बांधकामासाठी वास्तुविशारद (Architect) यांच्या निवडीकरीता Jury and Board of Assessor (JBA) या समितीची स्थापना करण्यात आली होती.

Jury and Board of Assessor (JBA) समितीने प्रस्तावित केलेल्या ३ आर्किटेक्चर कंपन्यांची अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय अशी निवड करण्यात आली. प्रथम क्रमांक विजेत्या वास्तुशास्त्रज्ञ (Architect) कंपनीकडून संग्रहालय शास्त्रातील अनुभवी व जाणकार तज्ञ व प्रशिक्षण संस्था उभारणीचा अनुभव असलेल्या तज्ञ यांच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे महाराष्ट्र राज्यातील ४५ जमातींचे जीवन व कला संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या मौल्यवान व दुर्मिळ वस्तूंचे गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्राची स्थापना करण्याच्या अनुषंगाने आर्किटेक्चर नकाशे, आराखडे व संग्रहालयाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर नकाशे, आराखडे व संग्रहालयाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक तांत्रिक तपासणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केले असता, सार्वजनिक बांधकाम विभागाने संग्रहालयाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकात सुधारणा सुचविली असून त्यावर पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) २३३९६ (१८-०७-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांची ७५०० पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदांमुळे आश्रमशाळांतील शिक्षणाचा व शैक्षणिक व्यवस्थेची कामे करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित (२५-१०-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात स्वयंसेवी संस्थेव्दारा चालविण्यात येणाऱ्या ५५६ आश्रमशाळांपैकी सद्य:स्थितीत ५४१ अनुदानित आश्रमशाळा सुरु आहेत. सदर आश्रमशाळांकरीता वर्ग ३ व वर्ग ४ अशी मिळून १५,६११ पदे मंजूर असून मंजूर पदांपैकी १४,२६२ पदे भरलेली आहेत व १,३४९ पदे रिक्त आहेत.

(३) अनुदानित आश्रमशाळेकरीता आवश्यक असणाऱ्या पदांचा सुधारित आकृतिबंध तयार करण्यात आला असून त्यासंदर्भातील प्रस्ताव मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गारगाव (ता.वाडा, जि.पालघर) येथील वनव्यामुळे घरे जळालेल्या कुटुंबियांना घरकुले बांधून देण्याबाबत

**(१०) २३५४५ (१८-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गारगाव (ता.वाडा, जि.पालघर) येथील वनव्यामुळे घरे जळालेल्या कुटुंबीयांना पक्की घरकुले बांधून देण्याबाबतची मागणी येथील नागरिकांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गारगाव येथील आदिम कातकरी कुटुंबीयांना घरकुले आणि इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित (१५-१०-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) वनव्यामुळे जळालेल्या ०८ कुटुंबांच्या कुटुंबाची नोंदणी करून ग्रामपंचायतकडून ग्रामसभेच्या मंजुरीसह प्रस्ताव मागवून सदर कुटुंबांना प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PM JANMAN) योजनेंतर्गत कुटुंबांना घरकुले मंजूर करण्याची प्रक्रिया क्षेत्रिय स्तरावर सुरू करण्यात आली आहे.

संबंधित कातकरी कुटुबियांना नविन घरकुले मिळताच तात्काळ वीजजोडणी करून देण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावरून करण्यात येणार आहे.

सध्या मौजे गारगाव ग्रामपंचायत मार्फत पाणीपुरवठा सुरु आहे. तसेच तेथे जलजीवन मिशन अंतर्गत नविन नळ पाणीपुरवठा योजना तयार करण्याचे काम सुरु आहे. रोजगार हमी योजनेंतर्गत कातकरी वस्तीमध्ये नविन रस्त्याचे काम सुरु आहे.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्याबाबत

**(११) २३५९१ (१८-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान आणि थकीत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्याना दोन लाख रुपयापर्यंतचे कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता आणि कर्ज माफीवरील रक्कम प्रथम दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत व त्यानंतर सन २०२३ च्या दिवाळीपर्यंत देण्यात येईल असे मा.कृषी मंत्री यांनी आश्वासन दिले असूनही शेतकऱ्यांना सदर रक्कम मिळाली नसल्याचे तसेच शिराळा तालुक्यातील (जि.सांगली) २५ ते ३० टक्के शेतकरी ५० हजार रुपयाच्या प्रोत्साहनपर अनुदानापासून अद्याप वंचित राहिले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिराळा तालुक्यासह अन्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन भत्ता आणि कर्ज माफीवरील उर्वरित रक्कम देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२४-१०-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ अंतर्गत पात्र ठरलेल्या राज्यातील ३२.४१ लाख शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले आहे. त्यापैकी ३२.२७ लाख कर्जखात्यांना रुपये २०,४९७.१३ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच शिराळा तालुक्यातील सदर योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या ३८७७ कर्जखात्यांनी आधार प्रमाणीकरण केले असून त्यापैकी ३८६८ कर्जखात्यांना रुपये १९.४७ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरीत कर्जखात्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

तसेच महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या १५.१६ लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण झाले असून त्यापैकी १४.३८ कर्जखात्यांना रुपये ५२१६.७५ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच शिराळा तालुक्यातील सदर योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या ७७०४ कर्जखात्यांनी आधार प्रमाणीकरण केले असून त्यापैकी ७३४९ कर्जखात्यांना रुपये २३.६७ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरीत कर्जखात्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर महानगरपालिकेतील तत्कालीन उपायुक्त यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१२) २३६२२ (१८-०६-२०२४) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर महानगरपालिकेतील तत्कालीन उपायुक्त यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधिंनी दिनांक ५ एप्रिल, २०२४ रोजी मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) प्राप्त तक्रारीवर मुख्यलेखापरिक्षक, महानगरपालिका यांचेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.
(३) सदर कामात प्रशासकीय त्रुटी व अनियमितता आढळलेल्या आहेत. या कामात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आढळून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून कंत्राटी पध्दतीने विदयुत बस खरेदी करण्याच्या कराराबाबत

**(१३) २३६२३ (१८-०६-२०२४) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एस.टी महामंडळाने ५ हजार १५० विदयुत बस कंत्राटी पध्दतीने घेण्याचा करार माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये एका कंपनीशी केला असून कंपनीने दर महिन्याला २१५ बसचा पुरवठा करण्याचे करारात नमुद असतानाही माहे मार्च व एप्रिल महिन्यात एकही बस न पुरविल्याप्रकरणी कंपनीचे कंत्राट रद्द करण्यात यावे अशी मागणी एस.टी. कर्मचारी काँग्रेसने दिनांक ४ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास एस.टी. महामंडळाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एस.टी. महामंडळाकडे प्रवाशांसाठी गाड्या कमी पडणार असून त्यांची गैरसोय होणार आहे अनेक गाड्या जीर्ण झाल्या असून नादुरुस्त आहेत, सदर इलेक्ट्रीक बस पुरवठादार कंपनीने गेल्या दोन महिन्यांत एकही बस पुरवलेली नाही, हा कराराचा भंग असल्याने संबंधित कंपनीवर व्यवस्थापनाने कारवाई केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर कंपनीवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१), (२), (३) व (४) रा.प. महामंडळात विद्युत प्रणालीवर चालणाऱ्या ५१५० ई बसेस भाडेतत्वावर घेण्याकरीता मे.ई व्ही. ट्रान्स (MSR) प्रा.लि. यांचे समवेत दिनांक ०२/११/२०२३ रोजी करार करण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत सद्य:स्थितीत ०९ मीटरच्या २० बसेस प्राप्त झाल्या आहेत. उर्वरित बसेस माहे जुलै, २०२४ ते डिसेंबर, २०२५ या कालावधीत टप्प्या-टप्प्याने दाखल होणार आहेत.

तसेच पुरवठादारामार्फत बसेसचा पुरवठा विहित कालावधीत न केल्याने तसेच बसेसचे प्रोटोटाईप सादर करण्यास विलंब झाला असल्याने करारातील तरतूदीनुसार रुपये ३,७७,२४,०००/- इतक्या रकमेची दंडात्मक कारवाई करणेकरीता पुरवठादारास नोटीस बजावण्यात आली आहे.

---

## राज्यातील नवीन बालधोरणाचा आराखडा तयार करण्याबाबत

**(१४) २३८६५ (२०-०७-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाने बालहक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक तज्ञांशी चर्चा करुन नवीन बालधोरणाचा आराखडा तयार केला असून त्यामध्ये हवामान बदल, मोठ्या शहरांतील प्रदूषणांचा बालकांच्या विकासावर होत असलेला परिणाम या बाबींचा नव्याने समावेश करण्यात येणार असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोशल मिडीयाचा बालकांच्या विकासावर होणारा परीणाम या घटकाचा सदर बालधोरणात समावेश करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०७-१०-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सोशल मिडीयाचा बालकांच्या विकासावर होणारा परीणाम या घटकाचा नवीन बाल धोरण आराखडामध्ये समावेश करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना पाणी पुरवठा करण्याबाबत

**(१५) २३९२८ (१७-०६-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) येथील शहराला केवळ ४०० एम.एल.डी. पाण्याचा पुरवठा केला जात असून तेथील नागरिकांना टँकरचे क्षारयुक्त पाणी प्यावे लागत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वसई-विरार महानगरपालिका प्रशासनाकडे दिनांक ०१ मार्च, २०२४ रोजी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहराच्या विविध भागात प्रतिदिनी ४०० एम.एल.डी. पाणीपुरवठा केला जातो परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात पाण्याचा पुरवठा पुरेसा नसल्यामुळे नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात नागरिकांनी तक्रारी करुनही त्याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई महानगरपालिका आयुक्तांकडून होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०९-२०२४) :** (१) अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(२) वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार विविध स्त्रोतातून उपलब्ध होणाऱ्या पाणीपुरवठापैकी गळती वजा जाता प्रत्यक्षात २८०.५० द.ल.ली. प्रतीदिन पाणीपुरवठा होत आहे.
(३) व (४) महानगरपालिका क्षेत्रात नियमित पाणीपुरवठा करणे अंतर्गत महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या पाणीपुरवठा योजनेतून महानगरपालिकेस उपलब्ध करुन दिलेल्या पाण्यामुळे अमृत १ अंतर्गत अंथरलेल्या जलवाहिन्या व उभारलेल्या जलकुंभांची जलदाब चाचणी घेण्यात आली. तसेच नवीन नळजोडणीची प्रक्रिया करण्यात येत आहे.

अमृत २ अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेच्या विस्तारीकरणाच्या प्रकल्प अहवालास शासन स्तरावर मंजूरी प्राप्त झाली असून दिनांक १६/०२/२०२४ रोजी याकामी पॅकेज १ चे कार्यादेश देण्यात आले आहे. सदरचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच पॅकेज २ करीता निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना रेडी रेकनरच्या १५ टक्के रक्कम अदा करण्याची मुदत संपत आली असल्याबाबत

**(१६) २४०३३ (१२-०८-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकीय भूखंडावरील रेडी रेकनरच्या १५ टक्के रक्कम अदा करून मालकी हक्क देण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने दिनांक ८ मार्च २०१९ रोजी घेतला असून त्याकरीता तीन वर्षाची व नंतर दोन वर्षाची देण्यात आलेली मुदत संपत आली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय भूखंडावरील सहकारी संस्थांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०३-१०-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) निवासी/रहिवाशी प्रयोजनार्थ शासनामार्फत प्रदान केलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ रुपांतरण करताना सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत अधिमूल्याची रक्कम कमी करण्याबाबतची शासन अधिसूचना दिनांक १६/०३/२०२४ व शुध्दीपत्रक शासन अधिसूचना दिनांक १८/०३/२०२४ व दिनांक २८/०६/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील मध्यम प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) २४०८९ (२२-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहानुर, चंद्रभागा, पूर्णा, सपन पंढरी, गर्गा व बोर्डीनाला (जि.अमरावती) येथील सात मध्यम प्रकल्प असून त्या प्रकल्पातील मेळघाटातील गर्गा व चांदूरबाजार तालुक्यातील बोर्डीनाला या प्रकल्पाची निवड फक्त कागदोपत्री असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्गा व बोर्डीनाला प्रकल्प या दोन्ही प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर महामंडळांतर्गत शहानूर, चंद्रभागा, पुर्णा, सपन, पंढरी, वासणी व गर्गा, बोर्डीनाला ही आठ मध्यम प्रकल्प असून, त्यापैकी शहानुर प्रकल्प पूर्ण झालेला आहे. व उर्वरित सात प्रकल्प बांधकामाधीन आहेत. त्यापैकी पंढरी, वासणी व गर्गा हे तीन प्रकल्प मा.राज्यपालांचे सिंचन अनुशेष कार्यक्रमांतर्गत समाविष्ट आहेत.

मेळघाटमधील गर्गा मध्यम प्रकल्पाची निवड सविस्तर सर्व्हेक्षण करून करण्यात आली असून महामंडळ निर्णय क्र.विपाविम/ कांता-४/ ५१७२/ गर्गा म.प्र/ प्र.मा/(६४/ २००८)/ २००८ दिनांक १४/११/२००८ अन्वये प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाची घळभरणी पूर्ण झाली असून प्रकल्पामध्ये एकूण २९.७३ द.ल.घ.मी पाणीसाठ्यापैकी८.८९ द.ल.घ.मी. (अंशत:) पाणीसाठा निर्माण झाला असून प्रकल्पाच्या सांडव्याचे काम शिल्लक आहे. तथा बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे एकूण ४२८१ हेक्टर चे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच बोर्डीनाला मध्यम प्रकल्प प्रगतीपथावर असून बोर्डीनाला धरणाचे काम पूर्ण झाले आहे. उपसा सिंचन योजना व नलिका वितरण प्रणालिचे काम प्रगतीपथावर असून, सदर प्रकल्पाचे काम जून, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अचलपूर व चांदुर बाजार तालुक्यातील लाभधारकांना ४१२६ हे. सिंचनाचा लाभ होणार आहे.

(२) गर्गा मध्यम प्रकल्प, ता.धारणी या प्रकल्पावर आतापर्यंत रुपये ४७८.३५ कोटी खर्च झाला असून सन २०२४-२५ करीता रुपये ७५ कोटी तरतुद मंजूर आहे.

बोर्डीनाला प्रकल्पावर मार्च, २०२४ पर्यंत रुपये ४३२.१० कोटी खर्च झालेला असून वित्तीय वर्ष सन २०२४-२०२५ करीता ५५ कोटी रुपयांची राज्य अर्थसंकल्पात तरतूद मंजूर आहे.

(३) गर्गा मध्यम प्रकल्पाचे रुपये ७०८.१४ कोटीच्या द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे. प्रकल्पावर मार्च, २०२४ पर्यंत रुपये ४७८.३५ कोटी खर्च झालेला असून प्रकल्प जून, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजीत आहे. बोर्डीनाला प्रकल्प बांधकामाच्या प्रगत टप्प्यावर असल्याने हा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील कापड उद्योग निर्मिती कंपन्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१८) २४०९९ (०८-०८-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) एमआयडीसीत साधारण ४२० कंपन्या असून त्यापैकी १३८ कंपन्या या कापड उद्योगावर प्रक्रिया करणाऱ्या असल्याने त्यांना अन्य कंपन्यांच्या तुलनेत अधिक पाणी लागत असून या कंपन्याना एमआयडीसीकडून अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे या कापड कंपनांच्या उत्पादनावर परिणाम होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमआयडीसीमार्फत कंपन्या व घरगुती वापरासाठी पाणीपुरवठा केला जात असून घरगुती वापराच्या पाणीपुरवठ्याचे प्रमाण ८० टक्के इतके आहे. त्या तुलनेत कंपन्यांना दिले जाणारे पाणी हे २० टक्के इतकेच असून त्यातही कंपन्यांना अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात असल्याने या कंपन्यांनी एमआयडीसीकडे वारंवार तक्रारी करुन देखिल अद्याप तोडगा निघत नसल्याने सदरील कंपन्या आर्थिक अडचणीत येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सदर कंपन्याना सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०७-१०-२०२४) :** (१) हे खरे नाही.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रामध्ये ५२५ एवढे औद्योगिक घटक असून, त्यापैकी सद्य:स्थितीत चालू असलेल्या वस्त्रोद्योग/कापडावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची संख्या ४० इतकी आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

मऔवि महामंडळामार्फत डोंबिवली विभागातंर्गत डोंबिवली औद्योगिक क्षेत्र, तळोजा औद्योगिक क्षेत्र, रहिवाशी विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत २७ गावे, उल्हासनगर महानगरपालिका (पाले नळजोडणी) औद्योगिक क्षेत्राबाहेरील निवासी प्रकल्प, उद्योगधंदे यांना पाणीपुरवठा केला जातो. तळोजा उपविभाग व डोंबिवली उपविभाग मिळुन सद्य:स्थितीत एकूण २६५ ते २७० द.ल.लि.प्रतिदिन एवढा पाणीपुरवठा केला जातो.

वरील एकूण २७० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठ्यापैकी ७५.०० द.ल.लि. पाणीपुरवठा सदर औद्योगिक घटकांना करण्यात येत आहे. डोंबिवली औद्योगिक क्षेत्र, फेज-१ मधील काही कंपन्यांच्या पाणी पुरवठ्याबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. तथापि, अशा सर्व तक्रारींचे निवारण म.औ.वि. महामंडळाकडून तातडीने करण्यात येते.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील सद्य:स्थितीत चालू असलेल्या घटकांना त्यांच्या गरजेनुसार पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारणी एकात्मिक आदिवासी प्रकल्प (जि.अमरावती) कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) २४१४९ (१८-०७-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रकल्प अधिकारी, धारणी एकात्मिक आदिवासी प्रकल्प (जि.अमरावती) या पदावर नव्याने नियुक्त झालेल्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येऊन त्यांचेकडे प्रकल्प अधिकारी तसेच उप विभागीय अधिकारी पदाचीही जबाबदारी असल्याचे माहे मे,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये आदिवासी बांधवांची संख्या साधारणत: २ लाख ७५ हजाराहून अधिक असून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक कामांसाठी अन्य तालुक्यांमध्ये कार्यालये नसल्याने सदर आदिवासी बांधवांना धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात कामासाठी यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी पाड्यांच्या काही दुर्गम भागांमध्ये रहदारीसाठी रस्ते, नागरिकांना वेळेवर वैद्यकीय सोईसुविधा मिळत नसल्यामुळे याभागात बालमृत्यू व मातामृत्यूच्या प्रमाणात वाढत होणे, आदिवासी बांधवांसाठी शासनाकडून अनेक योजनांची घोषणा करण्यात येऊनही धारणी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात अधिकारी/ कर्मचारी यांच्या रिक्त पदांमुळे सदर योजनांचा लाभ आदिवासीबांधवांपर्यंत पोहचत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धारणी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयामध्ये पूर्णवेळ आयएएस प्रकल्प अधिकाऱ्याची नियुक्ती करणे, इतर संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे तसेच प्रत्येक तालुक्यांमध्ये आदिवासींसाठी कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित (११-१०-२०२४) :** (१) हे, खरे आहे.

आदिवासी विकास विभागातील अतिसंवदेनशील व मागास प्रकल्पांवर नव्याने नियुक्त झालेल्या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून कार्यवाही करण्यात येते.

(२) व (३) हे, खरे नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी कार्यालयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण अमरावती जिल्ह्याचे आहे. अमरावती जिल्ह्यात १४ तालुके असून, आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये धारणी व चिखलदरा हे २ तालुके समाविष्ट आहे. इतर १२ तालुक्यांचा विस्तार लक्षात घेऊन आदिवासी लाभार्थींच्या सोईसाठी धारणी कार्यालयाचे उपकार्यालय मोर्शी व अमरावती येथे प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आले आहे.

धारणी प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४ या वर्षात ग्रामिण भागातील रस्ते विकास करण्यासाठी रुपये १८३५.३४ लाख निधी खर्च झाला असून, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत रुपये १४३.०० लाख निधी खर्च झाला आहे.

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रातील गरोदर महिला व स्तनदा मातांना पहिले सहा महिने एकवेळचा चौरस आहार देण्याकरीता ही योजना राबविली जाते. या योजनेमुळे मातामृत्यू व बालमृत्यू कमी होण्यास मदत होत आहे. तसेच अतिकुपोषित मुलांसाठी VCDC (ग्राम बालविकास केंद्र) या सोबतच CTC (बाल उपचार केंद्र), NRC (पोषण पुनर्वसन केंद्र) योजनाही राबविण्यात येतात. CTC, NRC मध्ये जेव्हा कुपोषित बालकांना दवाखाना उपराचार्थ ठेवण्यात येते तेव्हा त्यांच्या पालकांना बुडीत मजूरी देण्यात येते. त्यामूळे मेळघाट क्षेत्रातील मातामृत्यू, बालमृत्यू, कुपोषण कमी करण्यास मदत होत आहे.

लाभार्थी संख्या - तीव्र कमी वजनाचे बालक २५७८, कमी वजनाचे बालक ९०९६, तीव्र कुपोषित १७०, मध्यम तीव्र कुपोषित २०७८, सर्वसाधारण श्रेणीतील बालके २३७३९, गरोदर माता ३२८९, स्तनदा माता २७६७.

(४) महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची ५१ वी बैठक मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११/१०/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. जनजाती सल्लागार परिषदेमध्ये सामान्य प्रशासन विभागाने प्रकल्प अधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी अशी पदस्थापना न देता नियोजन करुन ११ संवेदनशील प्रकल्प कार्यालयांमध्ये पूर्णवेळ भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी देण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून सरळसेवेच्या व पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये तालुकास्तरावर प्रकल्प कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत प्राप्त प्रस्तावाची छाननी करुन आवश्यकतेनुसार प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत जलजीवन मिशन योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२०) २४२८२ (०८-०८-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत जलजीवन मिशनच्या माध्यमातून जिल्ह्यातील १३ तालुक्यातील १३४४ गावांमध्ये नळ योजनेद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी काम सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे, तसेच सदरील कामे पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागणार असून सदर योजनेस विलंब करणाऱ्या संबंधतिांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे उपरोक्त सर्व कामाचा दर्जा कायम ठेवण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०९-१०-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत १३ तालुक्यांतील १३२४ गावांमध्ये १३०२ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे घेण्यात आलेली आहेत.
(२) नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत १३०२ योजनांपैकी ४७४ योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत व उर्वरित ८२८ कामे प्रगतीपथावर आहेत. सदरील कामे विविध टप्प्यात असून, पूर्ण करण्याचे नियोजन जिल्हास्तरावर करण्यात आले आहे.

योजनांमध्ये विलंब करणाऱ्या दोषींवर विभागीय स्तरावरून कार्यवाही सुरु आहे. काम सुरू न करणाऱ्या ३ कंत्राटदारांचे करारनामे रद्द करण्यात आलेले आहेत. संथगतीने काम सुरु असलेल्या ८ योजनांच्या कंत्राटदारांवर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे व काही इतर संथगतीने चालू असलेल्या कामांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीच्या नावाने कार्यारंभ आदेश दिलेल्या परंतु ग्रामपंचायतने काम सुरू न केलेल्या १० योजनांचे करारनामे रद्द करून या योजनांची निविदा विभागीय स्तरावर करण्यात आलेल्या आहेत व ह्यामधून ६ कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून, ही कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

केंद्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे उपरोक्त सर्व कामांचा दर्जा कायम ठेवण्याकरीता शासनाने नेमून दिलेल्या त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणेमार्फत प्रगतीपथाच्या विविध टप्प्यांवर वेळोवेळी त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.